ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# कोविड - 19 चा समाजावर झालेला परिणाम - एक सामाजिक अध्ययन

**प्रा.डॉ.पंढरी एन. वाघ.**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, जि.सी.पा.मु.महा.धानोरा, गडचिरोली

कोरोना नामक नव्या आजाराला कारनीभूत कोविड - 19 विषाणूची जगभरातील लाखो लोकांना लागन झाल्याचे दिसून येते. या करीता प्रत्येक देश आपल्या पद्वतीने कोरोनाला हरवायचा प्रयत्न करीत आहे. या आजाराची उत्पत्ती चीनमधील वुहान या शहरातुन झाल्याचे निष्पन्न झालेले आहेत. वुहान कोरोना व्हायरस 2019 - 20 मध्ये चीनच्या वुहान शहरात2019 च्या मध्यभागी एक नविन प्रकारचे कोरोना व्हायरस संसर्ग म्हणून प्ररंभ झाला. बऱ्याच लोकांना हे निमोनीयाचे लक्षन असावे असे वाटु लागले. त्यातुन असे दिसून आले की, मासे पीडीत बहुतेक लोक वुहान सीफ्रुड मार्केटमध्ये मासे विकतात.आणि सजीव जनावरांचा व्यापार करतात. नंतर चिनी शास्त्रज्ञाने कोरोना व्हायरस एक नविन विषाणू आहे हे ओळखले. जे लोक बाजाराशी संबंधित होते त्या बऱ्याच लोकांमध्ये या वायरसचे लक्षने दिसून आली. हा विषाणू एसएआरएस इतका गंभीर कींवा जीवघेणा आहे की नाही हे आधी स्पष्ट झालेले नव्हते. 20 जानेवारी 2020 रोजी चिनी पंतप्रधान ली केकियांग यांनी त्याला कोविड रोगाचा प्रतीबंध करण्यासाठी आणि त्यावर नियंत्रन ठेवण्यासाठी निर्णायक व प्रभावी प्रयत्न करण्याचे आव्हान केले. मार्च 31 ,2020 पर्यंत जगाच्या जवळपास 180 देशांमध्ये या रोगाने धुमाकुळ घालून कित्येल लाख लोकांचे प्राण या आजाराने घेतले. त्यामुळे हा आजार संपूर्ण जगासाठी आव्हन ठरलेले आहे.

प्रथम संशयीत प्रकरने WHO कडे 31 डिसेंबर 2019 रोजी नोंदविण्यात आली. रोगनिदान विषयक आजाराची पहिली घटना डिसें 2019 रोजी नोंदविण्यात आली. 1 जानेवारी 2020रोजी बाजार बंद झाला. आणि कोरोना व्हायरसच्या संसर्गाची चिन्हे असलेल्यांना वेगळे केले गेले. 23 जानेवारी 2020रोजी वुहानला बाजूला ठेवण्यात आले. आणि वुहानमधील व बाहेरच्यासर्व सार्वजनीक वाहतुकीला स्थगिती दिली. जानेवारी 2020 रोजी, कोरोना विषाणूचा प्रसार हा जागतीक आरोग्य संघटनेने आंतरराष्ट्रीय चिंतेचा सार्वजनिक आरोग्य आणीबानी म्हणून घोषीत केले.

**कोरोना विषाणूचे नाव :-** लॅटीन भाषेमध्ये कोरोनाचा अर्थ मुकुट असा होतो. या वायरसच्या कणांमधून, जे इर्द-गर्द काटे निघतात ते इलेक्ट्रान सुक्ष्मदर्शीमध्ये पाहिले असता मुकुटासारखा आकार दिसून येतो. यावरूनच याला कोरोना वायरस असे नामकरन करण्यात आले. सुर्यग्रहणाच्या वेळी चंद्र सुर्याला झाकून टाकतो. तेंव्हा चंद्रच्या चारही बाजूला सुर्याची कीरणे दिसू लागतात, त्यालाही कोरोना असे म्हणतात. जागतीक आरोग्य संघटनेने मंगळवारला विषाणूच्या साथीच्या रोगाचे नामकरन COVID-19 असे केले. आतापर्यत जगामध्ये सुमारे 28,74615 लोकांना संसर्ग झाला. तर 200812 लोक मरण पावले. तरीही या रोगावर आजही नियंत्रन आलेले दिसून येत नाही. कारन या रोगावर अजूनही कोनतीही प्रभावी अशी लस शास्त्रज्ञांना सापडलेली नाही. त्यामुळे या रोगाचा प्रभाव वाढत असलेला दिसून येतो.

**कोरोना विषाणूचा इतिहास :-** कोरोना विषाणू प्रथमतः 1930 च्या दशकात प्राण्यांमध्ये रोगकारक अस्तीत्व म्हणून आढळला. 1960 च्या सुमारास तो मानवी श्वसन संस्थेत संसर्गरोग निर्माण करणारा घटक आहे असे

समजले. मानवी कोरोना विषाणू या सदराखाली प्रथम निदर्शनास आलेले कोरोना विषाणू म्हणजे : 229 E, OCut, OCrw आदिंचे वर्णन आहेत. परंतु त्याचे सखोल असे अन्वेश झालेले दिसून आले नाही. कोरोना विषाणू त्याच्या अजून त्याच्या वेगळ्याा रूपात प्रकटला ते 2003 च्या जागतिक उद्रेकात म्हणजेच सार्स [ Severe acute respiratory syndrome SARS] आणि त्यावेळी त्याच्या त्यारूपाचे नाव होते, सार्स कोरोना विषाणू नविन श्वसन संस्था रोगकारक म्हणून हा उद्रेक साधारनता नऊ महिणे चालला. त्यात सूमारे 8000 लोकांना संसर्ग झाला. व अंदाजे 775 लोकांचा जीव त्याने घेतला. बरेच तज्ञ असे माणतात की, सार्स कोरोना विषाणू सदृष्य विषाणूपासून त्याच्या नैसर्गीक स्त्रोतात म्हणजेच वटवाघळात व मध्यंतरीच्या यजमानात म्हणजे एकप्रकारच्या मांजरात झाालेली आहे. असे संशोधक सुसान पौटनेन उल्लेख करतात.

जसे की सार्स उद्रेक हा 2003 मध्ये नियंत्रणात आला. नंतर या विषाणूने पुन्हा डोके वर काढले नाही. नविन कोरोना विषाणू 2012 मध्ये मध्य पुर्व जगतात उदयास आला. त्याचे नाव मर्स कोरोना विषाणू तो सौदी अरेबियात व इतर मध्य पुर्व देशात बऱ्याच श्वसनसंस्था संसर्गांना कारणीभूत असल्याचे निदर्शनास आले. या संसर्गात मृत्यदर खुप जास्त असला तरी काही तुरळक केसेस वगळता 2013 पर्यंत उद्रेकाची गती जास्त नव्हती. 2014 च्या आगष्ट पर्यंत एकूण 850 प्रकरणे आणि साधारण 330 मृत्यू या मर्स कोरोनामुळे झाले, असे फेहर व पर्लम्यान 2015 या संशांधकाने लिहीले आहे.

सार्स व मर्सनंतर मानवी कोरोना विषाणू अजून वेगळ्या रूपात अवतरला . तो 2019 डिसेंबरमध्ये जेंव्हा काही अनिश्चीत कारणामुळे उद्भवलेल्या न्यूमोनियाचे रूग्ण चीनच्या वुहान शहरातील रूग्णाल्यात दाखल झााले. हे रूग्ण वुहानच्या सीफूड व वेट अनिमल होलसेल मार्केटसी संबंधित होते. प्रंरभीच्या तपासनी अहवालात त्यांना कोरोनाचा संसर्ग झाल्याची संभावना वर्तविली. 11फरवरी 2020 ला डब्ल्यूएचओने नव्या 'मानवी कोरोना विषाणू आजार 2019' चे कोविड-19' असे नामकरण केले.

**पहिल्या केसेसची नोंदणी डिसेंबर 2019 :-** पाच रुग्ण एआरडिएस या लक्षणासह रूग्णालयात दाखल झाले व त्यात 2 जानेवारी 2020 पर्यंत 41 रूग्ण दाखल व कोरोना विषाणू संसर्ग झाल्याचे प्रयोगशाळेतील अहवालसिद्ध, 22 जानेवारी 2020 रोजी 517 रूग्णांची नोंद पहिले 17 मृत्यूची नोंद . 25 जानेवारी 2020 रोजी 1975 केसेसची नोंद व पुष्टी. आजतागायत कोविड-19 ची जागतीक आकडेवारी अशी; एकूण केसेस 2874615 त्यातील मृत्यूमुखी 200812 , बरे झालेले 823306 रूग्णांची संख्या आहेत. भारतातील स्थिती एकूण रूग्ण 26267 आहे. तर आजपर्यंत मृत्यू झालेल्यांची संख्या आहे 825; तर बरे झालेले रूग्ण 5938एवढे आहेत. (दि. 16.4.2020) कोविड-19 ची सामान्य लक्षने आहेत ताप, खोकला, थकवा, त्यासोबत डोकेदुखी, थुंकीयेणे, अतिसार, इत्यादी यावरून असे लक्षात येते की, कोविड- 19 सार्स मर्सव इतर फ्लूसदृश्य आजारांच्या लक्षणांमध्ये बरेचसे साम्य आहे. प्रतिबंधात्मक उपाय करतांणा यामुळे गोंधळ निर्माण होवू शकतो. भारतासारख्या देशात जेथे एकूण लोकसंख्योसाठी असलेली वैद्यकीय सुविधांची स्थिती , वैद्यकीय, आहार, स्वच्छतेविषयी जागरूकता इ. पाहता कठोर उपाययोजनांचीच गरज आहे.शासनाने घोषीत केलेल्या उपाययोजनांचे काटेकोर पालन करूया, आणि कोविड 19 ला संपवू या.

कोरोना विषाणूचे संशोधन करण्यासाठी संशोधकाने खालील उद्देश डोळ्याासमोर ठेवून संशोधन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. संशोधनाचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत

1. कोरोना विषाणूमुळे झालेल्या समाजावर सामाजिक परीणामांचा अभ्यास करणे.
2. कोरोना विषाणूमुळे देशाच्या अर्थकारणचा अभ्यास

करणे.

3. कोरोना विषाणूमुळे समाजाच्या आरोग्यावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.
4. कोरोनामुळे विकासात झालेल्या अडचणींचा शोध घेणे.
5. कोरोना विषाणूमुळे झालेल्या जनजिवनाचा अभ्यास करणे.

**गृहितके :-** कोरोना आजारामुळे संपूर्ण देश संकटात सापडलेला आहे, हे ध्यानात ठेवून संशोधकाने पुढील गृहितकाची मांडणी केलेली आहे, ती पुढीलप्रमाणे :-

1. कोरोनामुळे देशावर सामाजिक परीणाम झालेला आहे.
2. कोरोना विषाणूमुळे देशाच्या आर्थिक परिस्थितीवर परीणाम झालेला आहे.
3. कोरोना विषाणूमुळे समाजाचे आरोग्य धोक्यात आले.
4. कोरोनामुळे माणूस माणसा पासून दुर गेला.
5. कोरोना विषाणू हा चायनाने देशावर केलेला जैविक हल्ला होय.

**संशोधन आराखडा :-** प्रस्तुत संशोधन विषय नवीन आहे. ही समस्या संपुर्ण जगासाठी नविन असल्यामुळे संशोधकाने अन्वेषणात्मक किंवा परीचयात्मक या संशोधन आराखड्याची निवड केलेली आहे. डॉक्टरकडे येणाऱ्या रोग्याला माहित नसते की, डॉक्टर कोणते प्रश्न विचारेल तर तो रोग्याची प्रंरभीक तपासनी करून नविन माहीती मीळविण्याचा प्रयत्न करतो. म्हणजेच तो त्या बिमारीचे निदान करीत असतो. तसेच करोना विषाणू आपल्यासाठी नविन आहे. त्यामुळे आपल्याला या विषाणू विषयी पाहीजे तेवढी माहिती नाही. त्याबरोबरच कोणतेही प्रभावी औषध नाही. त्यामुळे या आजाराने बऱ्याचशा लोकांचे प्राण जात आहे. हेच प्रस्तुत संशोधनातून सिध्द करण्यासाठी या संशोधन आराखड्यायाची निवड केलेली आहे.

**तथ्य संकलन पध्दती :-** प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीय पद्वती किवा स्त्रोत यामधील व्यक्तीगत कागदपत्रे दोन सार्वजनीक कागदपत्रे यात वर्तमानपत्रे, साप्ताहीके, या तथ्याचा उपयोग केला जाईल. तसेच काही संदर्भ ग्रंथ म्हणुन काही यंशोधनाच्या पुस्तकांचाही उपयोग केला जाइल. तसेच संशोधन करतांना निरीक्षणाच्या अनियंत्रीत निरीक्षण पद्वतीने समाजाचे निरीक्षण केले जाईल. संशोधक या परिस्थितीमध्ये कोणतीही ढवळाढवळ करू शकत नाही. कारण करोना विषाणू हा संसर्ग जय असल्यामुळे या ठिकाणी ढवळाढवळ करणे योग्य ठरू शकत नाही.

**नमुना निवड :-** प्रस्तुत संशोधनाकरीता गैरसंभाव्यता नमूना निवड पद्वतीमधील सहेतूक किंवा उद्देश पुर्ण नमुना या संशोधनाकरीता उपयोगाचा ठरेल. संशोधकाला चीनमधून आलेल्या कोरोना वायरस मुळे देशातील लोकांना कशा प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे हे जाणून घेण्यासाठी या नमूण्याचा संशोधकाने संशोधन करण्यासाठी निवड केलेली आहे.

**कोरोना वायरसमुळे समाजावरील परिणाम :-** कोरानाचा संसर्गजण्य विषाणू जानेवारी 2020 पासून जगाच्या वेगवेगळया देशांमध्ये पाय पसरवायला सुरूवात केलेली आहे एप्रिलच्या शेवटपर्यंत जावळपास 193 देशात कोरोनाचा संसर्ग पसरलेला दिसून येतो . या विषाणूमुळे संपूर्ण जगाला आपल्या कवेत घेतलेले आहे. या विषाणूमुळे संपूर्ण देशाची अर्थव्यस्थाच कोलमुदून गेलेली आहे. म्हणजेच या रोगाचा सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, आरोग्य, सांस्कृतीक, पर्यटन, दळणवळण, व ग्रामीण भागातील शेतीव्यवसायावर देखील परिणाम झालेला दिसून येत आहे.

**सामाजिक परिणाम :-** कोरोनामुळे सामाजिक परिणाम

झालेला आहे, देशातील लोकांनी उन्हाळ्याामध्ये जे नियोजन केलेले होत, त्या संपूर्ण नियोजनावर कोरोनामुळे संपूर्ण पाणी फिरलेले दिसून येते. ऐकमेकांशी संवाध साधने ,ऐकत्र बसून कोणत्याही कामाचे नियोजन करने व इतर कामाचे नियोजन या कोरोनामुळे बिघडलेले आहे. लग्नसमारंभ, नातेवाइकांच्या भेटीगाठी यासारख्या सामाजिक कार्यक्रमावर वाइट परीणाम झालेला दिसून येतो. कोणी मरणपावले तरीही त्याच्या मरनाला जाण्याची परवानगी घ्यावी लागत आहे. कोरोनाच्या भीतीमुळे लोकांचे सकाळचे फिरनेही बंद झालेले आहे. कोरोनापुर्वी बाहेर ठिकाणी पोट भरण्यासाठी गेल्ल्या मजुरांचे हाल होत आहे. काही लाकं आपल्या रक्ताच्या नात्यापासून दुर कुठेतरी अडकलेले आहे.

**धार्मिक परिणाम :-** देशाची अर्थव्यवस्था काही प्रमाणात धार्मीक समारंभांवर व धार्मिक ठिकानांवर अवलंबून आहे. परंतु कोरोनामुळे याही कार्यक्रमांवर बंदी आणली आहे. भारतीय समाजात अनेक प्रसीद्ध धार्मिक देवालये आहेत, त्याठीकाणी भाविक मोठ्या श्रद्धेने आपल्या इच्छा आकांक्षांची पुर्ती देवदर्शनातून होते त्याकरीता देशाच्या वेगवेगळ्याा भागातुन देवदर्शनासाठी जातात. तर काही भाविक त्या पावन स्थळांना आपल्या इच्छेनुसार दान पण देत असतात. बाहेरून जाणाऱ्या भाविकांमुळे त्याठीकाणच्या लोकांची पोटापाण्याची व व्यवसायाची भरभराट होत असते. परंतु कोविड-19 मुळे या व्यवसायावर परीणाम झालेला दिसून येतो. त्याबरोबरच या वर्षीच्या धार्मिक उत्सवावरही बंदी आणल्यामुळे धार्मिक कार्यावर परीणाम झालेला आहे.

**आर्थिक परीणाम :-** कोणत्याही देशाची प्रगती त्या देशाच्या अर्थव्यवस्थेवरून दिसून येते. देशाचा विकास किती झाला हे पाहण्यासाठी एकूणच त्या देशातील व्यक्तींच्या राहणीमानावरूनही दिसून येते. पण कोविड-19 मुळे देशाची अर्थव्यवस्थाच थांबली आहे याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झालेला दिसून येतो. देशातील ,कारखाने, छोटे उद्योग, इतर उत्पादने देणारे साधने कोविडच्या संसर्गजन्य वायरसमुळे थांबले , त्याचा परीणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला. देशाला सर्वात मोठ्याप्रमाणात उत्पादन मिळवून देणारी रेल्वे ही थांबली हासुद्धा देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणामच आहे. एकूणच दळणवळणाची मग ते एस. टी.महामंडळ असो की इतर खाजगी प्रवासाचे साधने असो या सर्व गोष्टींवर परिणाम झालेला आहे. त्याबरोबरच लहान मोठे उन्हाळ्याच्या दिवसात व्यवसाय करणारे यांच्यावरही फार मोठा परीणाम झालेला आहे. कोरोनाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झाल्यामुळे सरकारने देशातील जनतेला आव्हान केले की आपन देशाच्या मदतीकरीता अर्थसाहाय करा. देशातील जनतेने सरकारची ही सुचना मान्य करून पी.एम.व सी.एम. फंडात पैसा जमा करायला सुरूवात झाली .

**आरोग्यावर परिणाम :-** कोविड-19 मुळे देशातील जनतेवर व त्यांच्या आरोग्यावर मोठा परिणाम झालेला दिसून येतो .या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी डॉक्टर, नर्सेस, कंपाउंडर, वार्डबाय, तंत्रज्ञ, व यासारखे काही समाजसेवी संस्था दिवस रात्र काम करीत आहेत. यांना मदत म्हणुन पोलीस दल हे सूद्धा देशाचे आरोग्य अबाधीत राखण्यासाठी प्रयत्न करीत आहे. एवढेच नाही तर लोकांना समजावूनही सांगत आहे की तुम्ही घराच्या बाहेर निघू नका. आरोग्याची काळजी घेण्यासाठी लोकांना मार्गदर्शनही करीत आहे. जे ऐकले नाही त्यांना लाठीचा प्रसादही देत आहे. जे लोक आरोग्य सेवेत काम करीत आहे अशा काही लोकांना आपले प्राणही गमवावे लागत आहे. त्याकरीताच लोकांना घरी राहण्याचा,सुरक्षित अंतर ठेवण्याचा ,तोंडाला मास लावण्याचा, वारंवार हात स्वच्छ धुण्याचा सल्लाही ही वैद्यकीय अधिकारी देण्याचा प्रयत्न करीत आहे. एकुणच समाजाचे आरोग्य चांगले असावे म्हणून वारंवार सुचनांचे पालान जनतेने करावे व आपल्या देशातुन कोरोनाला हाकलुन लावुया, आणि समाजाचे आरोग्य अबाधीत राखुया.

**राजकिय परिणाम :-** कोविड -19 चा राजकारणावरही परीणाम झालेला दिसून येतो. देशाच्या अनेक राज्यांमध्ये काही ठिकानी पोट निवडनुका होत्या तर काही ठिकानी जिल्हा परीषद, पंचायत समीती, ग्रामपंचायत इत्यादी निवडनुका होत्या . परंतु या सर्व राजकीय कार्यक्रमांना कोविड 19 या साथीने या कार्यक्रमांवर पाणी फेरले. हे सर्व राजकीय कार्यक्रम पुढे घेण्याचे ठरविण्यात आले. एवढेच नव्हेतर कोणत्याही नेत्याला कोविडचाच विचार करून निर्णय घ्यावा लागत आहे. देशातील इतर राजकीय कार्यक्रम सध्यातरी थांबलेलेच दिसून येते, हाही कोरोनाचाच परिणाम आहे

**शैक्षणिक परिणाम :-** या विषाणूचा परिणाम देशातील शैक्षणिक संस्थांवर सुद्धा झालेला आहे. ऐन परीक्षेच्या तोडावर या विषाणूने आपले डोके वर काढले आणि देशाच्या भावी पीढीची वाताहत केली . अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी आईवडीलां पासून दुर राहतात. त्या मुलांच्या शिक्षणावार परिणाम होतो. त्यांचा जो उत्साह होता तो या कोरोनाने हिरावून घेतलेला आहे. अजूनही परीक्षा कधी होईल हे निश्चीत झालेले नाही. त्यामुळे शैक्षणिक परिणाम झालेला आहे. एकुणच शिक्षणासी संबंधीत सर्वच गोष्टिंवर परिणाम झालेला आहे हे नाकारता येत नाही.

**पर्यटनावर परिणाम :-** बाहेरच्या देशातुन आपल्या देशामध्ये अनेक पर्यटक येतात. त्याचा फायदा आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला होत असतो. तसेच त्या ठिकानच्या व्यावसायीकांनाही होत असतो. परंतु कोविडने याही व्यवसायावर पाणी फेरले आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला चटका लावून ठेवला आहे.

**निष्कर्ष :-** कोविड -19 या संसर्ग जन्म रोगाने देशाच्या सामाजिक जिवनार परिणाम केलेला आहे. मानसापासून मानसाला दुर ठेवण्याचा कार्यक्रम या कोविडने केलेला आहे. दुसरे म्हणजे समाजाच्या आरोग्यावरही परीणाम झालेला आहे. देशातील काही लोक शेकहॉंड घ्यायचे परंतु तेही या कोरोनाने हिरावून घेतले. आणि मानसापासून मानसाला दुर केले. ऐकमेकांच्या जवळ जावून बोलनेही थांबले आहे. दुरूनच रामराम करून त्याला बगल देत आहे. ऐकमेकांच्या संपर्कापासून व्यक्ती दुर गेलेला आहे. कोविडचा आणखी एक परिणाम म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेवर झालेला आहे. देशाची अर्थव्यवस्था या कोरोनामुळे डबघाइस आलेली दिसून येते. कारण देशाच्या एकुन उत्पादनावर याचा परिणाम झालेला आहे. देशाचे जे विकासाचे कामे चालू होते तेही आता थांबलेले आहे. एकुणच देशाच्या विकासामध्ये कोरोनाने अडचनी निर्माण केलेल्या आहे. शेवटचा निष्कर्ष म्हणजे असा की देशाचे जनजीवन विस्कळीत झालेले आहे. काही लोकं मजुरीसाठी बाहेरगावी गेले, त्यालोकांना घरी येणे शक्य नसल्यामुळे मध्येच कुठेतरी थांबावे लागले. काही व्यक्ती 1000 हजार कि.मी.चा चा राजकारणावरही प्रवास करून आपल्या घरी पोहचले. एवढेच नव्हेतर कोरोनाने अनेक समस्याही निर्माण केलेल्या आहेत.

**संदर्भ सुची**

1. *डॉ. प्रदीप आगलावे - सामाजिक अध्ययन प्रा.डॉ. संशोधन पद्वती, साईनाथ प्रकाशन नागपूर- 2010*
2. *डॉ. सुधीर बोधनकर -सामाजिक सामाजिक संशोधन पद्वती, साईनाथ प्रकाशन नागपूर. नागपूर,2007*
3. *लोकमत वर्तमान पत्र - दि.4/4/2020, 5/4/2020*



4. *पुण्यनगरी वर्तमान पत्र - दि. 1/4/2020*